**<u>औरंगाबाद, नाशिक, अमरावती, नागपूर विभागातील शेतकऱ्यांना दिलासा</u>**

# कापूस, सोयाबीन व धान उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाईसाठी १०१२ कोटी रुपयांच्या रकमेस मंत्रीमंडळाची मान्यता

**-- एकनाथराव खडसे**

मुंबई, दि.९ : औरंगाबाद, नाशिक विभागातील कापूस उत्पादक शेतकरी आणि अमरावती व नागपूर विभागातील सोयाबीन, धान उत्पादक शेतकऱ्यांना खरीप २०१५ मध्ये झालेली नुकसानभरपाई देण्यासाठी १०१२ कोटी रुपयांची मदत राज्य शासनातर्फे देण्यात येणार आहे. आज झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत या रक्कमेस मान्यता देण्यात आली, अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री एकनाथ खडसे यांनी आज येथे दिली.

यासंदर्भात अधिक माहिती देताना श्री.खडसे यांनी सांगीतले की, खरीप २०१५ मधील औरंगाबाद व नाशिक विभागातील कापूस उत्पादक शेतकरी तसेच अमरावती व नागपूर विभागातील सोयाबीन आणि नागपूर विभागातील धान उत्पादक शेतकऱ्यांना मदत करण्यासंदर्भात शासनाने मदत करण्याचा निर्णय घेतला होता.

औरंगाबाद व नाशिक विभागातील दुष्काळसदृष परिस्थिती जाहीर केलेल्या गावांमध्ये कापूस पिकांसाठी पिकविमा योजनेची मंडळनिहाय मदत जाहीर झाल्यानंतर विमा काढलेल्या सर्व शेतकऱ्यांना विमा योजनेच्या निकषानुसार मदत देण्यात येईल.

ज्या शेतकऱ्यांनी विमा उतरविलेला नाही त्यांना पिकविमा योजनेच्या मंडळ निहाय जाहीर केलेल्या रक्कमेच्या ५० टक्के रक्कम शासनाकडून देण्यात येईल. अशाच प्रकारची तरतूद अमरावती व नागपूर विभागातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना लागू करण्यात येणार आहे.

नागपूर विभागातील धान उत्पादक शेतकऱ्यांना धान पिकासंदर्भात खरेदी केंद्रा मार्फत खरेदी होणाऱ्या धानापोटी क्विंटलमागे २०० रुपये प्रोत्साहन अनुदान देण्याबाबत अन्न व नागरी पुरवठा विभागाने कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला. ज्या शेतकऱ्यांनी पिक विमा काढलेला नाही अशा शेतकऱ्यांना ही विशेष मदत देण्यात येईल.

दिनांक ३० डिसेंबर २०१५ व २ जानेवारी २०१६ च्या शासन निर्णयानुसार एखाद्या शेतकऱ्यास कोणत्याही पिकासाठी दोन हेक्टर पर्यंत निविष्ठा अनुदान वाटप झाले असल्यास उपरोक्त मदत देय असणार नाही, मात्र निविष्ठा अनुदान दोन हेक्टर पेक्षा कमी क्षेत्रासाठी वाटप झाले असल्यास उर्वरित क्षेत्रास वरील प्रमाणे मदत देय राहील.

औरंगाबाद व नाशिक विभागातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ६४७ कोटी रुपयांची रक्कम मंजूर करण्यात आली असून अमरावती व नागपूर विभागातील सोयाबीन पिक उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ३६५ कोटी अशी एकूण १०१२ कोटी रुपयांच्या रक्कमेस मंजूरी देण्यात आली आहे.

*****